*CNR No.MHNG100010722017*

स्पे.दि.दावा क्रं.१००/२०१७
जुना स्पे.दि.दा.क्रं.३५/२०१४
भगतसिंग+२ वि. अरूण
निशाणी क.८४

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रं.१ :-**

**साक्षीदाराचा शपथेवर सरतपास प्रतिवादीतर्फे श्री.ए.एन.धारकर वकील.**

१. मी शपथेवर खरे सांगते की, माझे वकील साहेबांनी मी दिलेल्या माहीती प्रमाणे माझे सरतपासणीचे शपथपत्र तयार केले व मला वाचून व समजावून सांगितले आणि त्यानंतर मी शपथपत्रावर सही केली. मला आता शपथपत्र **निशाणी क्रं.८४** दाखविले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी दस्तयादी **निशाणी क्रं.८६ व ८७** नुसार दस्त दाखल केलेले आहेत. सदर दस्तांमध्ये अरूणोदय कॉम्प्लेक्सचे ब्रावचर **निशाणी ९३** प्रमाणे आहे. दि.१४.०७.२०१३ रोजीचे भगतसिंग नागरी सहकारी पतसंस्थेमार्फत आलेले पत्र **निशाणी ९४** प्रमाणे आहे. माझे दि.१५.०७.२०१३ रोजीचे उत्तराची प्रत **निशाणी ९५** प्रमाणे आहे. माझे दि.१४.१०.२०१३ रोजीचे वादी यांना दिलेल्या पत्राची प्रत **निशाणी ९६** प्रमाणे आहे. वादी यांना वकीलांमार्फत दि.०८.११.२०१३ रोजी पाठविलेल्या नोटीशीची स्थळप्रत **निशाणी ९७** प्रमाणे आहे. माझे नावे व माझे पत्नीचे नावे वादी संस्थेकडे असलेल्या खात्याबाबत ग्राहक खतावणी गृहतारण कर्ज उतारा प्रत अनुक्रमे **निशाणी क्रं.९८ व ९९** प्रमाणे आहे. माझे दि.०३.१२.२०१३ रोजी वादी संस्थेकडे दिलेल्या पत्राची प्रत **निशाणी १००** प्रमाणे आहे.

मुख्याधिकारी नगर परिषद उमरेड यांनी दि.३१.०३.२०१५ रोजी मला दिलेले पत्र **<u>निशाणी १०१</u>** प्रमाणे आहे. अरूणोदय कॉम्प्लेक्सला नगर परिषदेमार्फत दुस-यांदा मिळालेल्या संमतीनंतर तयार केलेले ब्रावचर **<u>निशाणी १०२</u>** प्रमाणे आहे. अरूणोदय-२ या योजनेबाबत दि.१०.०५.२०१३ रोजी तयार केलेले मुळ नोंदणीकृत घोषणापत्र **<u>निशाणी १०३</u>** प्रमाणे आहे. माझ्या सहया असलेल्या सर्व दस्तांमधील मजकुर खरा व बरोबर आहे. दस्त निशाणी ६९ वरील हस्ताक्षर अरविंद हजारे सचिव भगतसिंग पतसंस्था यांचे आहे. सदर दस्त सौदा रद्द करण्याबाबत तयार केलेला आहे. दि.०४.१२.२०१३ रोजी माझे वकीलांनी वादी यांचे नोटीसला दिलेल्या नोटीसजबाबाची स्थळप्रत **<u>निशाणी १०४</u>** प्रमाणे आहे.

**<u>साक्षीदाराचा उलटतपास वादीकरीता ॲड.एन.आर.भिसीकर</u>**

२. वादीचे वकीलांचे तोंडी विनंतीवरून साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.

समक्ष | श्रवणोत्तर स्विकृती

(एस. के. फोकमारे)
दि.न्या.व.स्तर, उमरेड

(एस. के. फोकमारे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर., उमरेड

दिनांक : ०२/११/२०१९